आंदोलनकर्त्यांची पोलीस कर्मचाऱ्यांशी झटापट झाल्यानं आंदोलनाला हिंसक वळण लागलं. महाराष्ट्रातही विविध ठिकाणी बंद पाळण्यात आला.

<><><><><>

पहिला राष्ट्रीय अंतराळ दिवस येत्या शुक्रवारी म्हणजे २३ ऑगस्टला देशात साजरा केला जाणार आहे. या दिवसानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम इथं विशेष कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचं उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते केलं जाणार असल्याची माहिती अंतराळ राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी आज नवी दिल्लीत दिली. ते बातमीदारांशी बोलत होते.

गेल्यावर्षी आजच्या दिवशी चंद्रयान ३ मिशन अंतर्गत विक्रम लँडर चंद्राच्या पृष्ठभागावर सुरक्षितरित्या पोहोचलं आणि हे मिशन यशस्वी झालं. चंद्रावर यशस्वीरित्या पोहोचणारा भारत चौथा तर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश ठरला. भारतानं मिळवलेल्या यशानंतर अंतराळ अर्थव्यवस्थेत पुढील दहा वर्षांत पाचपटीनं वाढ अपेक्षित असून ही उलाढाल सुमारे ४४ अरब डॉलर्स इतकी होण्याचा विश्वास सिंह यांनी व्यक्त केला.

<><><><><>

बदलापूरमध्ये लहान मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडीनं येत्या शनिवारी ‘महाराष्ट्र बंद’ पुकारला आहे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज मुंबईत महाविकास आघाडीच्या बैठकीनंतर बातमीदारांना ही माहिती दिली..

राज्यात लहान मुलं, महिलांवरच्या अत्याचाराच्या प्रकरणात अनेक पटींनी वाढ झाली आहे. त्यामुळं हा बंद पुकारल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले.

